**स.के.नं.३०९/२०१९**
**नि. क्र. ३१**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.६ ची जबानी
माझे नाव – जितेंद्र विठ्ठल घाणेकर
वय वर्षे –६०, व्यवसाय – सेवा निवृत्त
राहणार – चिपळूण, ता.चिपळूण, जि.रत्नागिरी
मी सत्य प्रतिज्ञेवर असे कथन करतो की,

**<u>सरतपास अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीम.टी.टी तळेकर यांचेमार्फत सुरु.</u>**

सन २०१९ मध्ये स.पो.उ.नि. या पदावर चिपळूण पोलीस स्टेशन येथे कार्यरत होतो. दि.०३.०२.२०१९ रोजी सायं. ०४.३५ वा. सुमारास चिपळूण एस.टी डेपो येथून चिपळूण ते गुहागर जाणारी बस क्र.एमएच १४ बीटी २७६१ चालक अशोक रोहीदास लाड व वाहक एस.बी. गावडे येवून जात होते. मालघर एस.टी. स्टॉपच्या पुढे १०० फूट अंतरावर एका वळणावर गुहागर दिशेने एक आयशर टॅम्पो चालक रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून हयगयी व भरधावर वेगाने समोरून ०५.१० वा. सुमारास चूकीच्या दिशेने येवून बसला धडक दिली. सदर टेम्पोमध्ये आरोपी व त्याची पत्नी होती. अपघातामध्ये ते गंभीर जखमी झाले.

२. अपघातानंतर एस.टी. चालक, वाहक व प्रवाशांनी आरोपी व त्याच्या पत्नीला टेम्पोमधून बाहेर काढून उपजिल्हा रुग्णालय, कामथे, चिपळूण येथे उपचारासाठी दाखल केले. अपघाताच्या अनुषंगाने बस चालक अशोक रोहीदास लाड यांनी खबर दिल्यावरून मो.अ.र.क्र.१/२०१९ दाखल झाला. घटनास्थळाचा पंचनामा पो.हे.कॉ. कांबळे ब.नं.१३१ यांनी केला. घटनास्थळी छायाचित्रे काढली व नकाशा या कामी समाविष्ट केला. आता मला पान क्र.६/१ ते ६/१० वरील छायाचित्रे दाखवण्यात आली. ती तीच आहेत. त्यास **आर्टिकल अ** देण्यात येते. पान क्र.५ वर घटनास्थळाचा नकाशा आहे.

३.        अपघातानंतर जखमी कामथे येथील रुग्णालयात दाखल असल्याने तेथे त्यांचे जबाब नोंदविण्यात आले. तपासादरम्यान आरोपीविरूध्द सबळ पुरावा आढळून आल्याने मी फिर्यादी दिली. आता मला दि.०४.०२.२०१९ रोजीची फिर्याद दाखवण्यात आली. त्यावर माझी सही असून मजकूर खरा व बरोबर आहे त्यास **नि.३२** देण्यात येते. तपासादरम्यान एस.टी मधील ३ प्रवासी, चालक व वाहकाचे तपास टिपण नोंदविले. अपघातातील आरोपी गंभीर जखमी असल्याने त्यास पुढील उपचारासाठी वडूज, सातारा येथे पाठविले.

४.        तपासादरम्यान अपघातातील दोन्ही वाहनांची तांत्रीक तपासणी केली. सदर गुन्हयातील आरोपीस अटक करून न्यायालयात हजर केले. तपासादरम्यान आरोपी विरुध्द सबळ पुरावा आढळून आल्याने दोषारोप दाखल केले. आरोपीला पाहिल्यास ओळखू शकतो. आरोपी न्यायालयात हजर आहे.

सरतपास पुर्ण

**उलटतपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री.एम.एस.यादव यांचे तर्फे सुरु**

५.        हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ मालघर गावात आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ गुहागर–विजापूर राज्य महामार्गाचा भाग आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ वळणाचा व किंचीत चढाचा आहे. हे म्हणणे खरे आहे की, कथीत अपघातातील एस.टी. गुहागर कडे व आयशर टेम्पो चिपळूण कडे जात येत होता. हे म्हणणे खरे नाही की, एस.टी वाहनाची उंची आयशर टेम्पोच्या तुलनेने जास्त असते. हे म्हणणे खरे आहे की, या कामातील आयशर टेम्पोचे केबीन एस.टीच्या मानाने कमी उंचीचे होते.

६.        हे म्हणणे खरे नाही की, चालक वाहन समोरून पाहून चालवत असताना येणा–या वाहनाने कोणत्या बाजूने व कशी ठोकर दिली हे चालकास समजू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, कथीत घटनेदिवशी आयशर टेम्पोच्या पुढील चालकाने आयशर टेम्पोला पुढे जाण्याचा चुकीचा इशारा दिल्यामुळे आयशर चालकाने त्याची टेम्पो पुढे घेतली. हे म्हणणे खरे नाही की, कथीत घटनेमध्ये आयशर टेम्पो चालकाच्या चुकीचा

कोणताही संबंध नाही. आरोपीकडून एस.टी चे नुकसान म्हणून रक्कम ₹१५,०००/– वसुल केले किंवा कसे ते मला माहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की, अपघातामध्ये आरोपी गंभीर जखमी झाला आहे. हे म्हणणे खरे नाही की, कथीत अपघातामध्ये आरोपी कोणताही संबंध नव्हता व आरोपीने कोणतीही हयगयी व निष्काळजी पणा केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, खोटा मोटार वाहन अपघात रजि. क्र.१/२०१९ नोंदविला, खोटा तपास करून खोटे दोषारोप दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृती.
सही/–

(वाय.सी. पाटील )
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, व
न्यायादंडाधिकारी वर्ग–१, चिपळूण

दिनांक – ०८/१२/२०२५
चिपळूण.

**- प्रमाणपत्र -**

मी हमी देतो की, सदरच्या पी. डी. एफ. फाईलमधील मजकुर हा मुळ पुराव्यामधील प्रत्येक शब्दानुसार बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | एम.इ.आरेकर, लघुलेखक श्रेणी–३ |
| **न्यायालयाचे नाव** | **सह दिवाणी न्यायालय क.स्तर, चिपळूण, ता.चिपळूण जि.रत्नागिरी.** |
| पुरावा टंकलेखीत दिनांक | ०८.१२.२०२५ |
| न्यायिक अधिकारी यांनी सही केलेले दिनांक | ०८.१२.२०२५ |
| पुरावा अपलोड केलेले दिनांक | ०८.१२.२०२५ |